देवस्थान व्यवस्थापन समिती
पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर

# देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर.

(विधी व न्याय विभाग अंतर्गत)

२४०२ "ए " वॉर्ड, अपना बँक बिल्डींग तळमजला, उभा मारुती चौक, शिवाजी पेठ, कोल्हापूर.

फोन नं.(०२३१) २६२६१४७, २६२६७५० फॅक्स: (०२३१) २६२६७५०

E-mail - dmckolhapur@gmail.com Visit : www.mahalaxmikolhapur.com

क्र. देव वशि जा. ६३३/२०२४ दिनांक 17 MAR 2025

## दरपत्रक मागणी सुचना

**श्री. करवीर निवासिनी महालक्ष्मी अंबाबाई देवस्थानकडे मंदिरामध्ये वायव्य दिशेला मंदिर कार्यालयाच्या समोरच्या जुन्या कारंजाचा सविस्तर सर्व्हे करुन ड्रॉईंग तयार करणे करीता दरपत्रक देणे बाबत**

देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर या कार्यालयाकडे व्यवस्थेस असलेल्या शहर कोल्हापूर येथील श्री. करवीर निवासिनी महालक्ष्मी अंबाबाई देवस्थानकडे मंदिरामध्ये वायव्य दिशेला मंदिर कार्यालयाच्या समोरच्या जुन्या कारंजाचा सविस्तर सर्व्हे करुन ड्रॉईंग तयार करुन देणेस तयार असल्यास खालील मसुद्याप्रमाणे दर देणेत यावेत.

| क्र. | कामाचा तपशील | दर (सर्व करासहित व वाहतुकीसह) |
|---|---|---|
| १ | श्री. करवीर निवासिनी महालक्ष्मी अंबाबाई देवस्थानकडे मंदिरामध्ये वायव्य दिशेला मंदिर कार्यालयाच्या समोरच्या जुन्या कारंजाचा सविस्तर सर्व्हे करुन ड्रॉईंग तयार करणे | रु. /- |

वरील प्रमाणे कामांकरीता कंपनीचे लेटरपॅड वर सिलबंद दरपत्रक या कार्यालयाकडे दि. 24 /03/२०२५ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपुर्वी पोहोच करणेत यावे. सदर सिलबंद दरपत्रकावर विषय, दरपत्रक देणा-यांचे नाव व संपर्क नंबर नमुद करावा. दरपत्रकासोबत पॅन कार्डची प्रत देणेत यावी

अटी व शर्ती खालील प्रमाणे

१. सदर कामाची समक्ष जागेवर तपासणी करुनच दरपत्रक देणेचे आहे.
२. सदर कामी या कार्यालयाकडील उपअभियंता यांचेसोबत पाहणी करुन आवश्यक कामाची माहिती घेवून दर नमुद करणेचा आहे.
३. सदर काम आदेशाचे दिनांकापासुन १५ दिवसामध्ये पुर्ण करणेचे आहे.
४. सदर दरपत्रकामध्ये नमुद करणेत येणारे दर हे सर्व करासहित, सर्व आवश्यक साहित्य व वाहतुक खर्चासहित देणेचे आहेत.
५. दरपत्रक मंजूर झाले दराशिवाय कोणत्याही कारणास्तव दर वाढवून दिले जाणार नाहीत.
६. सदर कामाची ऑर्डर मिळताच आवश्यक्तेप्रमाणे काम पुर्ण करणेचे आहे.
७. दिले मुदतीमध्ये दरपत्रक प्राप्त न झालेस स्विकारले जाणार नाही.
८. दरपत्रकासोबत सोबत मक्तेदाराने पॅन कार्ड छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.
९. दरपत्रकासोबत जीएसटी सर्टीफिकेट (लागू असलेस) त्याची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.
१०. सदर कामाची व्याप्ती खालील प्रमाणे असुन त्यानुसार काम पुर्ण करुन देणेचे आहे.

**- कामाची व्याप्ती -**

१. कारंजाची सविस्तर मोजमापे घेणे.
२. कारंजाची सर्व बाजुने आतुन बाहेरुन असलेली सद्यस्थितीची मापे, त्यावर असलेली डिझाईन याची माहिती घेणे व ती ड्राईंगवर दाखविणे
३. सदर कारंजाचे सर्व बाजुने (चारही बाजु व वरुन) फोटो काढुन ते ड्रॉईंगवर दाखविणेत यावेत.

Scanned with OKEN Scanner

४. सि. स. नं. १८७ ख या जागेच्या नकाशामध्ये कारंजाचे सद्याचे स्थान दाखविणे.

५. सदर कारंजा हा श्री त्र्यंबोली मंदिर येथे शिफ्ट करणेचा आहे त्याकरीता ज्या ठिकाणी कारंजा परत बांधकाम करावयाचा आहे त्याची स्थिती गट नं. ३३८ च्या नकाशामध्ये दाखविणे.

६. वरील प्रमाणे नोंदी प्रमाणे कारंजाचे संपुर्ण मापासह ड्रॉईंग (Measured Drawing) ॲटो कॅड मध्ये करुन त्याच्या ५ कलर प्रिन्ट, एक सॉफ्ट कॉपी मेलव्दारे व एक कॉपी पेनड्राई मध्ये या कार्यालयाकडे सादर करणेची आहे .

Shivraj 17/03/2025

**सचिव**
**देवस्थान व्यवस्थापन समिती**
**पश्चिम महाराष्ट्र कोल्हापूर**

**प्रत -**

१) कार्यालयीन वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी
२) देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर मुख्य कार्यालय नोटीसबोर्डवर प्रसिध्दीसाठी
३) श्री. करवीर निवासिनी महालक्ष्मी अंबाबाई मंदिर कार्यालय, कोल्हापूर नोटीसबोर्डवर प्रसिध्दीसाठी
४) श्री केदारलिंग देवस्थान उपकार्यालय, वाडीरत्नागिरी ता. पन्हाळा जि. कोल्हापूर नोटीस बोर्डवर प्रसिध्दीसाठी
५) स्थानिक मंदिराकडे नोटीस बोर्डवर प्रसिध्दीसाठी

Scanned with OKEN Scanner